| जा.क्र./पोउआ/वाह/नियोजन/2425/२०२१ | |
|---|---|
| प्रेसनोट | दिनांक - 18 /०६/२०२१ |

चाकण वाहतूक विभागाचे हद्दीतील खालुंब्रे या ठिकाणावरुन सावरदरी,वासुली व भांबोली या ठिकाणी कंपन्यामध्ये जाणा-या व येणा-या बसेस व इतर वाहनांची संख्या जास्त असुन खालुंब्रे ते हुंडाई सर्कल या दरम्यानचा रोड लहान असल्याने सदर रोडवर वाहतूक कोंडी होत असते. सदर वाहतूक कोंडीचे वाहनांचा फ्लो हा चाकण-तळेगाव रोड असल्याने खालुंब्रे या ठिकाणी वाहन चालकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी खालुंब्रे ते हुंडाई सर्कल असा एकेरी वाहतूक करणे आवश्यक आहे.

ज्या अर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी सुधीर हिरेमठ भा.पो.से पोलीस उप-आयूक्त वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर,यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन खालील प्रमाणे अंतिम आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

**चाकण वाहतुक विभाग अंतर्गत**

**एकेरी वाहतूक मार्ग**

१. हुंडाई सर्कल ते खालुंब्रे कडे (एकुण १.४ कि.मी.) येणाऱ्या जड/अवजड वाहनांस प्रवेश बंद करणेत येत आहे.

➢ पर्यायी मार्ग :- हुंडाई सर्कल — एच पी चौक — चाकण तळेगाव राज्यमार्ग (एकुण २.५ कि.मी.) मार्गे इच्छित स्थळी जातील

तरी नागरिकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा. वरील प्रमाणे वरील वाहतुक बदलाबाबत वॉर्डन व वाहतुक कर्मचारी यांना सहकार्य करावे असे आवाहन पिंपरी चिंचवड शहर ,वाहतुक शाखा यांचे मार्फतीने करण्यात येत आहे.

Shiremath

(सुधीर हिरेमठ) भा.पो.से.
पोलीस उप-आयुक्त,
वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

प्रति,
जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

प्रत :
१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर
२) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.
३) प्रभारी अधिकारी **चाकण** वाहतुक विभाग
४) कार्यकारी अधिकारी, एम.आय.डी.सी.
/- सदर ठिकाणी वरील वाहतुक निर्बधाचे फलक बसविणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.